# आनंदमय जीवनासाठी

प्रा. रा. तु. भगत

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**आनंदमय जीवनासाठी : प्रा. रा. तु. भगत**

© **प्रा. रा. तु. भगत**

'शिवसुंदर' मोहिते पार्क,
रंकाळा, कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
मुजीब मुल्ला

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये ८०/-

# परिशिष्ट - १

## नामसूची

### (या पुस्तकात उल्लेख केलेल्या थोर माणसांची नावे)



१. आर्य चाणक्य
२. समर्थ रामदास
३. कवी कुसुमाग्रज
४. संत तुकाराम
५. पंडित नेहरू
६. कवी केशवसुत
७. स्वामी विवेकानंद
८. सोहिरोबा अंबिये
९. मादाम क्युरी
१०. न्यूटन
११. जॉर्ज स्टीफन्स
१२. जेपलिन बंधु
१३. कर्मवीर भाऊराव पाटील
१४. झिमरसन
१५. इ. एस्. हुयर
१६. आबालाल रहिमान
१७. लता मंगेशकर
१८. रवीन्द्रनाथ टागोर
१९. कॉपर
२०. हेडवूड
२१. टॉलस्टॉय
२२. संत गाडगेबाबा
२३. संत कबीर
२४. हेन्री फोर्ड
२५. फिलिप्स ब्रुक्स
२६. एफ्. क्वार्लेस
२७. एस्. जॉन्सन
२८. डिझेयली
२९. रॉबर्ट ब्राऊन
३०. शेरपा तेनसिंग
३१. एन्. होवे
३२. सुकरात
३३. आचार्य विनोबा
३४. डायडन
३५. ओ. मेरेडिथ
३६. गौतम बुद्ध




३७. येशू ख्रिस्त
३८. डिझ्रेयली
३९. पास्कल
४०. स्वामी दयानंद
४१. चार्वाक
४२. भगवान महावीर
४३. गीबन
४४. रिचर
४५. अरस्तु
४६. नेपोलियन बोनापार्ट
४७. हिटलर
४८. संत एकनाथ
४९. लोकहितवादी
५०. महात्मा फुले
५१. गोपाळ गणेश आगरकर
५२. राजर्षी-शाहू महाराज
५३. भगवान श्रीकृष्ण
५४. बादशहा शहाजहाँन
५५. आईनस्टाईन
५६. कीटस
५७. लॅव्हटर
५८. सिकन्दर
५९. महात्मा गांधी
६०. डॉ. राजेंद्रप्रसाद
६१. वामन पंडित
६२. एपिकुटेटस
६३. एरिका एंडरसन
६४. संत तुलसीदास
६५. विक्रमादित्य
६६. कॉरनेली
६७. सेनेका
६८. स्वामी विवेकानंद
६९. संत ज्ञानेश्वर
७०. माईकल
७१. बेंजामिन फ्रँकलिन
७२. निकोलस ब्रेटॉन
७३. मुसोलिनी
७४. थॉमस फ्यूलर



७५. छत्रपती शिवाजी महाराज
७६. वॉशिंग्टन
७७. गुरुनानक
७८. महंमद पैगंबर
७९. संत बसवेश्वर
८०. संत नामदेव
८१. सी सेरा
८२. हेन्री पोर्टर
८३. रोमा रोला
८४. हॉरेस
८५. सर नोवेल टॉमस
८६. जान रस्किन
८७. डेल कारनेमी
८८. संत सावता माळी
८९. संत चोखोबा
९०. संत गोरा कुंभार
९१. इमर्सन
९२. बा. भ. बोरकर
९३ बालकवी
९४. रॉबर्ट
९५. संत सेना न्हावी
९६. राष्ट्रसंत तुकडोजी
९७. सुभाषचंद्र बोस
९८. संत दादू दयाल
९९. नरसी मेहता
१००. स्वामी चक्रधर
१०१. संत पुरंदरदास
१०२. हेलन केलर
१०३. कोलंबस
१०४. रॉबर्ट हिल
१०५. एंडरसन
१०६. अल्बर्ट
१०७. जनरल लिंडसेना



# दोन शब्द



एक श्रेष्ठ तत्त्वचिंतक इमर्सन आम्हास विचारतात की, 'आपण असे निराश होऊन का बसलात ?' आपण या प्रश्नाचे उत्तर काय द्याल ? निराश होण्याची अनेक कारणे सांगाल. गंभीरपणे विचार केला तर आपण सांगितलेली सर्व उत्तरे निरर्थक आहेत. खरे कारण असे, की आपणापुढे आलेल्या संकटाला आपण धैर्यानं तोंड देऊ शकत नाही. आपल्यावर जी जबाबदारी टाकली गेली आहे त्यापासून आपण दूर पळत आहात. आपल्यावर जो कामाचा बोजा टाकला आहे, तो आपणाला झेपत नाही. संकटापासून पलायन करणे हा एक बहाणा आहे. आपणच आपणास दिलेला धोका आहे. कोणतेही संकट आले की हसतमुखाने ते झेलले पाहिजे. आपले संकट दूर करण्यासाठी दुरून कोणी येणार नाही. ते आपणच दूर केले पाहिजे. रॉबर्ट या विचारवंताने म्हटले आहे की, 'मर्द तोच असतो जो दर्द पितो'. आपण प्रथम पुरुषार्थ बाळगला पाहिजे. आपणच संकट आल्यावर गर्भगळीत होऊन बसलात तर देवसुद्धा आपले संकट दूर करण्यासाठी येणार नाही. शांतचित्ताने प्रथम संकटाची शक्ती ओळखावी. नंतर आपली सारी प्रेरणा पणाला लावावी. संकटेच घाबरतील. आपणास संकटांना घाबरण्याची गरज नाही. कारण आपणास संकटमुक्त होऊन समर्थपणे जगायचे आहे. जगण्यात आनंद आहे; तो अनुभवायचा आहे ! जगण्यात मौज आहे; ती उपभोगायची आहे !! जगण्यात गंमत आहे; ती करून बघायची आहे !!! आपले जगणे हसण्यासाठी आहे ! रडण्यासाठी नाही. आपले जगणे प्रगती करण्यासाठी आहे; निराश होऊन बसण्यासाठी नाही. आपले जगणे एक नवे गाणे व्हावे; आपले जगणे प्राजक्ताच्या फुलांचे सडे व्हावे; आपले जगणे चंदनाच्या झाडासारखे व्हावे; आपले जगणे विशाल नदीसारखे व्हावे आणि आपले जगणे मलयगिरी पर्वतावरील सुगंधित वाऱ्यासारखे व्हावे एवढ्यासाठीच हा शब्दप्रपंच मांडला आहे.

जी माणसे प्रसन्न चित्ताने जगतात ती प्राय: आरोग्यसंपन्न असतात. आपल्या भावना-विचार स्थिर ठेवले की जीवनही स्थिर होते. आनंदाने जगावेसे वाटते. 'हसत जगावे, जगत हसावे' हा तर जगण्याचा मुख्य सिद्धांत आहे. नित्य नवा दिवस जागृतीचा यावा, त्यातून आपल्या जीवनाला नवी दिशा मिळावी, असे सर्वांनाच वाटत असते. यासाठी प्रथम आपण पत्करलेले काम अत्यंत सुबकपणे पार पाडावे लागते. 'योग: कर्मसु कौशलम्' म्हणजे आपले काम सुंदर करणे हाच खरा जीवनाचा मोठेपणा आहे. काम किती छोटे आहे किंवा मोठे आहे, याला फारसे महत्त्व नसते; तर ते काम आपण किती सुबकपणे, तन्मयतेने, उत्तम दर्जाने आणि कौशल्याने करतो याला फार महत्त्व आहे. प्राप्त काल हा विशाल भूधर असून त्यात आपल्या कामाची सुंदर लेणी कोरली पाहिजेत. आपल्या उत्तम कामामुळेच आपल्या किर्तीचा सुगंध सर्वत्र पसरतो. यासाठी 'कर्मण्येवाधिकारस्ते' म्हणून सतत उत्तम कर्म करणे एवढाच आपला अधिकार आहे, असे समजले पाहिजे. मग अशा कामाच्या फळाची अपेक्षा न करताही आपणास सहज फळ मिळून जाते. काम अंगावर पडले म्हणून नाईलाजाने केले असे न करता अंगावर पडलेले काम उत्तमपणे पार पाडणे हाच खरा कर्मयज्ञ आहे. यासाठी 'मी हे केले' असा अहंकार मनी न बाळगता, 'मी देखील हे करू शकतो', अशी अस्मिता बाळगणे इष्ट ठरेल. म्हणून बा. भ. बोरकर म्हणतात :

'जीवन त्यांना कळले हो ।
मीपण ज्यांचे पक्व फळापरि गळले हो ।।'

या जगात जे भव्य आहे, दिव्य आहे, उदात्त आहे, उत्तुंग आहे आणि सुंदर आहे ते पाहून आपणास वेड लागले पाहिजे. बालकवी म्हणतात,

'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे ।
सुंदरतेच्या सुमनावरचे दव ते चुंबुनि घ्यावे ।।'

डोंगराळ प्रदेशातून खळखळ वाहणारा जलप्रभात, काळ्याकुट्ट ढगाला लाभलेली रुपेरी किनार, सप्तरंगाने साऱ्या आकाशाला गवसणी घालणारे इंद्रधनुष्य, आपली मान उंचावून आकाशाचे चुंबन घेऊ पाहणारे वृक्ष, एका क्षणार्धात सारी पृथ्वी प्रकाशात न्हाऊ घालणारी कडाडणारी वीज आणि अथांगपणे पसरलेल्या सागरावरील लाटा ही निसर्गाची सौंदर्यस्थळे पाहून कोणास वेड लागणार नाही ! नव्या तेजाने, नव्या दमाने नव्या सौंदर्याने आणि नव्या चैतन्याने निसर्ग सतत बदलत असतो. तो सतत आम्हास काही सांगत असतो, ते आपण नीट समजावून घेतले पाहिजे. आपण व्यर्थ निराश, दु:खी, अशांत, त्रस्त आणि निष्क्रिय बसण्यात काय अर्थ आहे ? निसर्गाकडे पाहून खूप शिकावे. निसर्ग हाच आपला खरा शिक्षक आहे. निसर्गातील चैतन्याचा स्फुल्लिंग मनी बाळगावा आणि ध्येयपूर्तीची स्फूर्ती मस्तकी धारण करावी !! मग जगण्यात आनंद आहे असे वाटेल. जीवन ही केवळ चैनीची वस्तु नसून कर्तव्याची भूमिका आहे

हे समजेल. जीवनातील आनंदाचे डोही आनंद तरंग निर्माण करण्याची इच्छा बळावेल आणि जीवन चंदनासारखे झिजत झिजत इतरांना सुगंधित करून सोडेल. या विचारातच जगण्याचे सार्थक आहे. ते येथे विस्ताराने सांगितले आहे.

***'हृदया हृदय एक जाहले***
***ये हृदयीचे ते हृदयी घातले***
***द्वैत न मोडता केले***
***आपणा ऐसे अर्जुना ।'***

हा ज्ञानेश्वरीतील विचार डोळ्यासमोर ठेवून जे मनी उमलले ते सर्वांच्या मनापर्यंत भिडविले. बिंदुने सिंधु व्हावे म्हणून केले. सरिताने सागर व्हावे म्हणून हे मांडले. ते आपल्या भावमय मनोकोशात विचारांचे नवे विश्व निर्माण करेल असा विश्वास वाटतो. वाचकांनी या पुस्तकातील एक चांगला विचार उचलला आणि त्याप्रमाणे आचार केला तर आनंद वाटेल !!

माझे बापुडे हे शब्द वाचकांच्या हृदयापर्यंत पोहचविण्याचे पवित्र कार्य माझे प्रिंय मित्र राजीव बर्वे यांनी केले. त्यामुळे त्यांचे आभार मानणे हे शब्दांच्या पलिकडचे आहे.

**–प्राचार्य रा. तु. भगत**

'शिवसुंदर'
मोहिते पार्क, रंकाळा,
कोल्हापूर - ४१६०१२.

## - अनुक्रम -

परिशिष्ट - १

| | | |
|---|---|---|
| १. | आनंदमय जीवनासाठी ! | ११ |
| २. | ही तर जीवनाच्या यशाची गुरुकिल्ली आहे ! | १९ |
| ३. | अनुभवाच्या गुरुकडून धडे शिकावेत ! | २८ |
| ४. | आपण बदललो की जग बदलते ! | ३८ |
| ५. | ज्ञान-विज्ञान अंगणी खेळू दे ! | ४८ |
| ६. | आपला खरा शत्रू कोण आहे ? | ५६ |
| ७. | 'आज'चे स्वागत करू या ! | ६५ |
| ८. | आपली खरी संपत्ती कोणती आहे ? | ७० |
| ९. | ही एवढी शिदोरी बांधून घ्या ना ! | ७९ |